# संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ युवा महोत्सवाचे थाटात उद्घाटन



**खामगाव/प्रतिनिधी**

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाचा युवा महोत्सव २०१५-१६ चा भव्य उद्घाटन सोहळा स्थानिक विदर्भ शिक्षण प्रसारक मंडळ द्वारा संचालित गो.से.विज्ञान, कला व वाणिज्य महाविद्यालय, खामगाव येथे २९ सप्टेंबर रोजी आ.भाऊसाहेब फुंडकर यांच्या हस्ते तर संगाबा अमरावती विद्यापीठाचे कुलगुरू डॉ.मोहन खेडकर यांच्या अध्यक्षतेखाली पार पडला. याप्रसंगी नरेंद्र बोबडे अध्यक्ष विदर्भ शिक्षण प्रसारक मंडळ खामगाव यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी मंचावर प्रमुख पाहुणे म्हणून विद्यापीठाचे सांस्कृतिक समन्वयक प्रा.एम.टी.देशमुख, श्री शिवाजी कॉलेज, अकोल्याचे उपप्राचार्य प्रा.एम.आर.इंगळे, महेश पटेल, निखिलेश नलोडे व महाविद्यालयाचे प्राचार्य व्ही.एस.बायस्कर हे विराजमान होते.

सर्वप्रथम महाविद्यालयाचे प्राचार्य व्ही.एस.बायस्कर यांनी प्रास्ताविक केले. उद्घाटनपर मार्गदर्शन करताना आ.भाऊसाहेब फुंडकर म्हणाले की, १९४७ साली स्थापन केलेले हे रोपटेरूपी महाविद्यालय आज वटवृक्ष झाले आहे. या महाविद्यालयातील अनेक माजी विद्यार्थी आज विविध क्षेत्रात आपले व महाविद्यालयाचे नाव गाजवित आहेत. या महाविद्यालयाचा माजी विद्यार्थी आज विविध क्षेत्रात आपले व महाविद्यालयाचे नाव गाजवित आहे. या महाविद्यालयातील अनेक विद्यार्थी आज विविध क्षेत्रात आपले व महाविद्यालयाचे नागव गाजवित आहेत. या महाविद्यालयाचा माजी विद्यार्थी म्हणून लाभलेला या बहुमानासाठी मी महाविद्यालयाचा व्यवस्थापनेचा आभारी आहे. विद्यार्थ्यांना संबोधित करताना ते म्हणाले की, हे चार दिवस विद्यार्थ्यांच्या आतील सुप्त गुणांना वाव देणारे आहे. अशा प्रकारचे युवा महोत्सव विद्यार्थी घडवितात व विकसित भारत घडवितात असेच महोत्सव मौलाचा वाटा उचलतात.

युवा महोत्सव हे विद्यार्थ्यांना त्यांच्या विविध क्षेत्रातील सुप्त गुणांना वाव मिळवून देण्याचे एक व्यासपीठ आहे. आज भारतातील ८० करोड जनता ही युवा आहे. या युवकांचे एकविसाव्या शतकातील भारताच्या विकासातील भूमिका ही अत्यंत महत्वाची आहे. त्यामुळे अशा कार्यक्रमातून खऱ्या अर्थाने युवक तयार होतात. तरी या संधीचा लाभ घेवून विद्यार्थ्यांनी समाजाची जडण-घडण करावी असे विदर्भ शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष मा.नरेंद्रजी बोबडे यांनी मार्गदर्शन केले..

जगामध्ये भारतीय संस्कृती ही सर्वात मोठी देणगी आहे. ही संस्कृती आजच्या काळात लुप्त पावत असताना युवा महोत्सवाच्या युवकांच्या विविध कला गुणांद्वारे भारतीय संस्कृतीचे जतन व दर्शन होते. यानंतर एम.टी.देशमुख, सांस्कृतिक समन्वयक संगाबा अमरावती विद्यापीठ, डॉ.एम.आर.इंगळे, उपप्राचार्य शिवाजी कॉलेज अकोला यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

या उद्घाटन कार्यक्रमाला महाविद्यालयाचे उपाध्यक्ष अशोक झुनझुनवाला, सचिव डॉ.सुभाष बोबडे, कोषाध्यक्ष प्रकाश तांबट, सदस्य राजेंद्र झांबड, अजिंक्य बोबडे, गो.से.महाविद्यालयाचे सर्व प्राध्यापक, कर्मचारी व अमरावती, यवतमाळ, वाशिम, अकेला व बुलढाणा जिल्ह्यातून आलेले विद्यार्थी व प्राध्यापक मोठ्या संख्येने उपस्थित होते. या कार्यक्रमाचे संचलन प्रा.सौ.एस.जी. वायचाळ यांनी तर आभार प्रदर्शन प्रा.पी.पी.ठाकूर यांनी केले.